# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# रविवार, दिनांक ०८ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. केंद्र सरकारची महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये 90 दिवसांसाठी किमान हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता.
2. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी आज दुपारी १ वाजेपर्यंत राज्यात २५ हजार उमेदवारांची नोंदणी; नागपूर विभागात एकूण ५ हजार ३६९ योजनादूत नेमण्यात येणार.
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर.

आणि

4. पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ चा आज समारोप; सात सुवर्ण, नऊ रौप्य आणि १३ कांस्य पदकांसोबत भारत पदकतालिकेत १८ व्या स्थानावर.

****

कृषिमंत्री धनंजय मुंडे

केंद्र सरकारने महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये **90** दिवसांसाठी किमान हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. त्यासाठी सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ही **4** हजार **892** रुपये प्रति क्विंटल इतकी निश्चित करण्यात आली आहे. राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत व्हावी आणि त्यांचे बाजारभाव पडल्याने नुकसान होऊ नये या दृष्टीने हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी, त्याचबरोबर सोया मिल्क, खाद्यतेल, सोया केक इत्यादी उत्पादने आयात करण्यावर शुल्क लावावे, तसेच सोयाबीन निर्यातीसाठी प्रतिक्विंटल किमान **50** डॉलर अनुदान द्यावे याबाबत कृषी मंत्र्यांनी केंद्राकडे पाठपुरावा केला होता. दरम्यान सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये आर्थिक मदतीसाठी राज्य सरकारने **4200** कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून दिलं असून येत्या दोन-तीन दिवसात या अनुदानाचं थेट वितरण शेतकऱ्यांच्या खात्यांत करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

## मुख्यमंत्री योजना दूत

शासनाच्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सरकारच्या माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयानं 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रम सुरू केला आहे.त्यासाठी इच्छुक उमेदवारांनी येत्या १३ सप्टेंबरपर्यंत **www.mahayojanadoot.org** या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. राज्यात ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात पाच हजार लोकसंख्येमागं एक अशा एकंदर पन्नास हजार योजनादूतांची सहा महिन्यांच्या कालावधीसाठी निवड केली जाणार आहे. त्यासाठी दरमहा १० हजार रूपये मानधनही दिलं जाईल. या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, तसंच उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान, अद्ययावत मोबाईल आणि आधारसंलग्न बँक खाते असणं आवश्यक आहे. या योजनेसाठी आज दुपारी १ वाजेपर्यंत राज्यात २५ हजार तर नागपूर विभागात १ हजार ७१९ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये एकूण ५ हजार ३६९ योजनादूत नेमण्यात येणार आहेत. यवतमाळ जिल्ह्यात नेमणार 1 हजार 444 मुख्यमंत्री योजनादूत तर वर्धा जिल्हयात ग्रामीण आणि शहरी भागात एकूण 673 योजनादूत नेमले जाणार आहेत.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आपल्या सरकारनं गेल्या दोन वर्षांत घेतलेले ६०० निर्णय सर्व समाजघटकांसाठी होते, मात्र मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे त्यापैकी अनेक निर्णय काहीसे झाकोळले गेले, असं मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडलं आहे. घरचं अर्थकारण सांभाळणारी लाडकी बहीण सगळ्यात हुशार असते, असं सांगून या योजनेला विरोध करणाऱ्यांवर त्यांनी टीका केली. सरकारनं ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, महिला, युवकांसाठी आणलेल्या योजनांचा पुनरुच्चार करून आपल्या सरकारचे हात अधिक बळकट करण्याचं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं. देवाची आळंदी इथं झालेल्या वारकरी संतपूजन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मारुती महाराज कुरेकर यांना शांतिब्रह्म पुरस्कार, तर रामराव महाराज ढोक यांना तुलसीदास पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

माजी आमदार गोपाल दास अग्रवाल

गोंदिया विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार गोपाल दास अग्रवाल यांनी भारतीय जनता पक्षाचा राजीनामा देत येत्या 13 सप्टेंबरला गोंदियात वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची घोषणा आज पत्रपरिषदेत केली. काँग्रेस पक्षाकडून सलग ५ वेळा आमदार राहिलेले अग्रवाल यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रवेश करून कमळ चिन्हावर गोंदिया विधानसभेची निवडणूक लढविली होती .मात्र त्यांना पराभव पत्करावा लागला. मागील पाच वर्षांत भाजपमध्ये राहून सुद्धा गोंदिया विधानसभेचा विकास न करता आल्याने आगामी विधानसभा निवडणुकित कांग्रेसमध्ये परतत असल्याचं त्यांनी जाहीर केलं आहे.

मंतैय्या बेडके

पाच सप्टेंबर रोजी देशभरातल्या ८२ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातले कलाशिक्षक सागर बगाडे आणि गडचिरोली जिल्ह्यातले मंतैय्या बेडके यांचा समावेश होता. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक डिजिटल शाळा, जाजावंडीचे शिक्षक मंतैय्या बेडके यांनी आकाशवाणीशी बोलताना कृतज्ञता व्यक्त केली.

*मला दिनांक ५ सप्टेंबर २०२४ ला हा पुरस्कार भारत देशाचे राष्ट्रपती महामहिम द्रौपदीजी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेला आहे. तर हा पुरस्कार मिळाल्यानंतर मी अतिशय उत्साह आणि आनंदी आहे, कारण कि या पुरस्कारामुळे मला सकारात्मक ऊर्जा आणि प्रेरणा मिळालेला आहे आणि पुढे मी अधिक जोमाने या भागातील आदिवासी आणि वंचित विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी मी कार्य करणार आहे. आणि दुर्गम भागातील जेवढेही शिक्षक आहे त्यांना आवाहन आहे, कि आपण दुर्गम भागातील शैक्षणिक वातावरण निर्माण करून, पालकांना शैक्षणिक महत्व सांगून जर आपण प्रामाणिकपणे कार्य केलं निश्चितच या दुर्गम भागाच्या शैक्षणिक विकास होईल.*

गृहमंत्री अमित शाह

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. आज संध्याकाळी साडेसात वाजता 'मुंबई समाचारच्या' द्विशताब्दी निमित्त तयार केलेल्या लघुपटाचं ते अनावरण करतील. १८२२ मधे मुंबईत सुरु झालेलं हे गुजराती

वर्तमानपत्र आशियातल्या सर्वात जुन्या वर्तमानपत्रांपैकी एक आहे. गृहमंत्री उद्या दिवसभर मुंबईतल्या विविध भागातल्या गणेश मंडळांना भेट देणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर निवासस्थानी आणि त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी जाऊन ते गणपती दर्शन घेतील. लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला आणि त्यानंतर वांद्रे पश्चिमेतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला देखील शाह भेट देणार आहेत.

गणेशोत्सव

गणेशोत्सवाचा आज दुसरा दिवस असून सर्वत्र भाविकांचा उत्साह दिसून येत आहे. गोंदिया जिल्ह्यात घरोघरी गणरायाचं स्वागत मोठ्या उत्साहात केलं गेलं तसंच विविध देखाव्यांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. राज्यात अनेक ठिकाणी दीड दिवसांच्या गणपतीच्या विसर्जनाला सुरुवात झाली आहे. चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे शहरात मूर्ती विसर्जनाच्या सोयीच्या दृष्टीने २५ कृत्रिम तलाव आणि १५ निर्माल्य कलशांची उभारणी करण्यात आली असुन सर्व घरगुती तसंच लहान मूर्तींचे विसर्जन कृत्रिम कुंडातच करण्याचं आवाहन मनपातर्फे करण्यात आलं आहे. अकोला शहरात डीजे आणि लेझर बीम फोकसच्या वाढता वापर नियंत्रित करण्याची मागणी अकोल्यातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. डीजेच्या अनियंत्रित वापरामुळे ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, लहान मुले, गर्भावती महिला यांच्यावर घातक परिणाम पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर ही मागणी करण्यात आली आहे.

वक्फ (अर्मेन्डमेंट) बिल

ऑल इंडिया औकाफ ट्रस्टीज, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने वक्फ (अमेन्डमेंट) बिल-२०२४ आणि वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४ यावर विचारविमर्श करण्यासाठी एक राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद आज संध्याकाळी ६ ते रात्री १० या वेळेत पुण्यातील कॅम्प परिसरातील असेम्ब्ली हॉल, आझम कॅम्पस, इथं होणार आहे. या परिषदेस ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे जनरल सेक्रेटरी हजरत मौलाना फजलूर-रहिम मुजद्दिदी, आणि उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश, बी.जी. कोळसे पाटील उपस्थित राहणार आहेत. या परिषदेत दोन्ही विधेयकांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे संसदेच्या संयुक्त

समितीसमोर एकसमान आणि एकमताने दृष्टीकोन मांडण्यासाठी मंथन करण्यात येईल.

पॅरिस पॅरालिम्पिक

पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ चा आज भारतीय वेळेनुसार रात्री साडे अकरा वाजता समारोप होत आहे. आज ११ व्या दिवशी महिलांच्या २०० मीटर नौका नयन स्पर्धेत **KL** १ प्रकारात भारताच्या पूजा ओझा हिने चौथा क्रमांक मिळवला. सात सुवर्ण, नऊ रौप्य आणि १३ कांस्य पदकांसोबत २९ पदकांची भारताने केलेली कमाई आजवरची सर्वोत्तम कामगिरी आहे. पदकतालिकेत भारत १८ व्या स्थानावर आहे. चीन पहिल्या, इंग्लंड दुसऱ्या तर अमेरिका तिसऱ्या स्थानावर राहिले. दरम्यान, काल पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत नवदीप सिंगनं सुवर्णपदक मिळवलं. इराणच्या खेळाडूनं प्रथम क्रमांक पटकावला होता, मात्र अयोग्य वर्तनासाठी त्याला अपात्र ठरवण्यात आल्यानं नवदीपला सुवर्णपदकाचा मान मिळाला. धावपटू सिमरन शर्मानं महिलांच्या २०० मीटर ट्रॅक स्पर्धेत कास्यपदक जिंकलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पदक विजेत्या खेळाडूचं अभिनंदन केलं आहे. वयाच्या ४०व्या वर्षी आपल्या पहिल्याच पॅरालिम्पिक स्पर्धेत पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात कांस्य पदक पटकावणाऱ्या होकातो होतोझे सेमा याचं देखील त्यांनी अभिनंदन केलं. दरम्यान, पॅरिसहून परतलेल्या पॅरालिम्पिक खेळाडूंचा नवी दिल्लीत केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांच्या हस्ते काल सत्कार करण्यात आला. यामध्ये अवनी लेखरा, मनीष नरवाल, प्रणव सूरमा, मोना अग्रवाल, रुबिना फ्रान्सिस आणि राकेश कुमार यांचा समावेश होता.

हवामान

आज चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली इथं मुसळधार पावसाचा येलो अलर्ट हवामान खात्यानं जारी केला आहे. दरम्यान, येत्या काही तासांत नागपूर, अमरावती, भंडारा, वर्धा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांत काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान, गडचिरोलीत मुसळधार पाऊस कोसळत असल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे.

*****